पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail**: prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- ०८/१०/२०२०

## मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री आर. एन. मेहरे यांच्या न्यायनिवाडा

⇨ सामुहीक बलत्कार प्रकरणी चार आरोपींना प्रत्येकी २० वर्षाच्या सश्रम कारावास व ५५,०००/- रु. दंडाची शिक्षा

पोलीस स्टेशन चामोर्शी अंतर्गत आरोपी नामे १) निखील नलीनी मंडल वय २६ वर्ष, २) राजेश राखला डाकवा वय ३० वर्ष, ३) महादेव रवी बारई वय २८ वर्ष, ४) स्वरुप अनिल मिस्त्री वय ३५ वर्ष हे दिनांक २९/०८/२०१८ रोजी यातील फिर्यादी व फिर्यादीचा होणारा पती लालडोंगरी कडे जाणाऱ्या कच्चा रोडवर बोलत उभे असतांना यातील चारही आरोपींनी त्या दोघांजवळ जावुन हाताने मारझोड करुन त्यांचे फोटो काढुन चार हजार रुपयेची मागणी केले. नाही दिल्यास फोटो नेटवर टाकु अशी भिती व धमकी देवुन फिर्यादीचा होणारा पती कडुन चार हजार रुपये लुटुन घेवुन फिर्यादीला जंगलात ओढत नेवुन तिच्यावर बळजबरीने सामुहीक बलत्कार केले.

सदरचा फिर्यादवरुन पोस्टे चामोर्शी येथे अप.क्र. २४२/२०१८ कलम ३७६ (ड) ३२३, ३८४, ३४१, ५०६, ५११ व ३४ भादवी गुन्हा नोंद करुन तपासात घेतले. व आरोपीला ०१/०९/२०१८ रोजी अटक करण्यात आला. गुन्ह्याचा तपास मपोउपनि/निशा खोब्रागडे यांनी पुर्ण करुन आरोपीविरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय गडचिरोली येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आला. स्पे.के.क्र. १५३/२०१८ अन्वये गुन्हा जिल्हा व सत्र न्यायालय-१ यांचे न्यायालयात खटला चालविण्यात आला.

न्यायालयाने साक्षीदारांचे बयान नोंदवुन आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने तसेच सरकारी वकिलांचा युक्तीवाद ग्राह् धरुन मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश-१ श्री आर.एन. मेहरे साो. यांनी चारही आरोपीस कलम २२३ भादवी मध्ये प्रत्येकी एक वर्ष शिक्षा, कलम ३८४ भादवी मध्ये तीन वर्ष शिक्षा व ४,०००/- रु. दंड, कलम ५०६ भादवी दोन वर्ष शिक्षा व १,०००/- रु. दंड आणि कलम ३७६ (ड) अन्वये प्रत्येकी २० वर्ष सश्रम कारावास व ५०,०००/- रु. दंडाची शिक्षा आज दिनांक ०७/१०/२०२० रोजी ठोठाविण्यात आला. तसेच मा. न्यायालयाने पिडीतास दोन लक्ष रुपये नुकसान भरपाई म्हणुन देण्याचे आदेश पारित केले आहेत.

सदर गुन्ह्याचा तपास मपोउपनि/निशा खोब्रागडे यांनी केले असुन सरकारी पक्षातर्फे जिल्हा सरकारी अभियोक्ता श्री. अनिल प्रधान यांनी बाजु मांडली व कोर्ट पैरवी म्हणुन पोलीस निरीक्षक, श्री. प्रकाश तुनकलवार यांनी काम पाहिले.